# ३ को धम्मसारी ?

(प्राचीन भारतात काही धार्मिक विधी प्रचिलत होत्या जसे, यज्ञ करणे, सतत यज्ञांत लाकुड, धान्य, तुप जाळुन पेटत ठेवलेल्या अग्नीने स्वताला तापवित राहणे, नदीत वा तळ्यांत उभे राहून आपले पाप धुवून काढून मुक्ती प्राप्त करणे इत्यादि.

खालील सुत्तांत अशाच धार्मिक विधींना महत्त्व देणाऱ्या सुन्दरिक भारद्वाज ब्राह्मणाला बुद्ध खरा धार्मिक विधी कसा असतो व आपण असे यज्ञ कसे करतो ते समजावुन सांगतात. ते म्हणतात, मी सुद्धा यज्ञातील आग सतत जाळत ठेवतो, मी सुद्धा तळ्यांत अंघोळ करीत राहतो, पण तुझा यज्ञ बाहेरचा आहे, तर माझा आंतरिक.

माझ्या यज्ञांत मी माझ्या मनातला अहंकार सतत जाळत असतो आणि माझ्या धम्माच्या तळ्यांत आंघोळ करून ओला न होताच मुक्ती प्राप्त करीत होतो.

या पाठ्य घटकात बुद्धाने यज्ञ म्हणजे काय? यज्ञांत काय आहूति द्यायची, कशी द्यायची हे नीट समजावून सांगितले आहे. यज्ञाचा खरा अर्थ आजही असाच घेतला तर आपण सारे धम्मचारी होवू.)

---

‘‘मा ब्राह्मण दारू समादहानो, सुद्धिं अमञ्ञि बहिद्धा एतं।
न हि तेन सुद्धिं कुसला वदन्ति, यो बाहिरेन परिसुद्धिमिच्छे ।।

‘‘हित्वा अहं ब्राह्मण दारूदाहं, अज्झत्तमे वुज्जलयामि जोतिं ।
निच्चाग्गिनी निच्चसमाहितत्तो, अरहं अहं ब्रह्मचरियं चरामि ।।

‘‘मानो हि ते ब्राह्मण खारिभारो, कोधो धुमो भस्मनि मोसवज्जं ।
जिव्हा सुजा हदयं जोतिठानं, अत्ता सुदन्तो पुरिसस्स जोति ।।

धम्मो रहदो ब्राह्मण सीलतित्थो, अनाविलो सब्बत्थि सतं पसत्थो ।
यत्थ हवे वेदगुनो सिनाता, अनल्लगत्ताव तरन्ति पारं ।।

‘‘सच्चं धम्मो संयमो ब्रह्मचरियं, मज्झेसिता ब्राह्मण ब्रह्मपत्ति ।
सतुज्जुभूतेसु नमो करोहि, तमहं नरं धम्मसारीति ब्रुमी’’ति ।।

**(संयुत्त निकायो सगाथावग्गपालि, ब्राह्मणसंयुत्त सुन्दरिकसुत्त (आवश्यक फेरफार करून)**

---

**शब्दार्थ / सद्दत्थ**

**दारू (नपु.)** – लाकुड, काष्ट.

**अमञ्ञि (अ.)** – कल्पना केली.

**अज्झत्तमेवुज्जलयामि** – अज्झत + ऐव + उज्जलयामि = आत + असो + प्रकाशमान.

**धुमो (पु.)** – धुर.

**मोसवज्जं (नपु.)** – असत्य, खोटे बोलणे.

**जोतिठानं** – जोति + ठान – (स्त्री.) – ज्योत प्रकाश + जागा.

**समादहानो (समादहति) (क्रि.)** – आग पेटविणे, एकत्र करणे.

**बहिद्धा (अ.)** – बाहेर.

**निच्चग्गिनी** – निच्च + अग्गिनी – नित्य आगीने.

**भस्मनि (नपु.)** – राख.

**सुजा (स्त्री.)** – हवनासाठी तुप घालण्याचा चमचा.

**रहदो (पु.)** – तलाव, तळे.

**सिनाता (सिनान)(नपु.)** – स्नान, आंघोळ.

**तरन्ति (क्रि.)** – तरतात, पोहतात.

**अनाविलो (वि.)** – स्वच्छ निर्मळ.

## अभ्यास

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) प्रचलित यज्ञापेक्षा बुद्धाचा यज्ञ वेगळा कसा स्पष्ट करा.

२) कोणत्या व्यक्तीस धम्मसारी म्हणावे ?